# प्रकरण २ रे

# ‘स्त्री-पुरूष तुलने’ ची मुलगामी मांडणी

# प्रकरण २ रे

## 'स्त्री-पुरुष तुलने'ची मूलगामी मांडणी

१९ व्या शतकातील स्त्रियांसमोर 'स्त्री' म्हणून जगणे बिकट झाले होते. त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत. १९ व्या शतकात स्त्रियांना व्यक्तिस्वातंत्र्य, सार्वभौमत्व, समानता, निर्णय स्वातंत्र्य असे अधिकार प्राप्त झाले नव्हते. समाज स्त्री ही एक व्यक्ति आहे हे धर्माच्या नावाखाली विसरूनच गेला होता. स्त्रियांना गृहबंदी जीवन जगावे लागत असे. पण याच शतकात स्त्री प्रश्नांची जाणीव होऊन स्त्रियांची बाजू मांडणारे, शास्त्रकर्त्यांना विरोध करून स्त्रीचे महत्त्व पटवून देणारे सुधारक घडले. त्यांच्या स्त्रीचे समाजातील स्थान उंचावण्याच्या प्रयत्नांना यशही आले.

यात जोतिबा फुले, आगरकर यांच्याबरोबरच काही नवशिक्षित स्त्रियाही होत्या. पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, आनंदीबाई कर्वे, सावित्रीबाई फुले ह्या त्यातील प्रमुख स्त्रिया होय. यापैकी ताराबाई शिंदे या बहुजन समाजातील स्त्रिने 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक लिहून स्त्री-पुरुष भेदभावासंबंधीचे जळजळीत वास्तव पुढे आणले.

ताराबाई शिंदेंनी 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक १८८२ मध्ये लिहून तत्कालीन समाजावर, पुरुषांवर आसुड ओढले. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर "स्त्री-पुरुष तुलना' अथवा स्त्रिया व पुरुष यात साहसी कोण?" हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध ताराबाई शिंदेनी रचिला असे स्पष्ट केलेले आहे. १९ व्या शतकात विशेषत: स्त्रियांना बंधनांनी जखडलेले असताना ताराबाईंनी स्त्री-पुरुष नात्यासंबंधी व स्त्रियांच्या शोषणासंबंधी भूमिका मांडली. स्त्री-पुरुष असमतोल नष्ट करून स्त्री जातीला न्याय मिळवून देण्याचा हेतू या पुस्तकात ताराबाईंनी मांडला. एका भारतीय स्त्रीने त्या काळात स्त्रीवादी विचारांचा फारसा प्रसार झाला नसतानाही क्रांतिकारक मते तर्कशुद्ध पद्धतीने मांडलेली दिसून येतात.

ताराबाई शिंदेंनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात 'स्त्री-पुरूष तुलना' हे एकच पुस्तक लिहिले. 'पण त्यात त्यांनी शंभर वर्षांपूर्वी जे स्त्री प्रतिष्ठेचे विचार मांडले आहेत व ते पाहता स्त्री- पुरूष समानतेच्या जाणीवा त्या काळातही ह्या स्त्रीच्या मनात स्पष्टपणे रूजल्या होत्या हे लक्षात येते.' त्यांनी या पुस्तकात स्त्री प्रतिष्ठा विषयीचे विचार स्पष्टपणे परखडपणे व धीटपणे मांडलेले आहेत. (जोगळेकर (१९९१) १) त्या काळातील स्त्री दास्याचे जीवन त्यांच्याही वाट्याला आले. त्यामुळे त्यांनी स्त्रियांची दु:खे स्वत: अनुभवली असल्याने त्यांनी स्त्रीदास्यासंबंधीचे प्रश्न नेमकेपणाने मांडलेले आहेत.

## जीवन परिचय

ताराबाईचा जीवनकाळ १८५०-१९१० असा मानला जातो. बुलढाण्यातील बापूजी शिंदे हे सधन शेतकरी होते. हे शिंदे घराणे बुलढाण्यात प्रतिष्ठेचे घराणे होते. बापूजी शिंदे ताराबाईंचे वडिल होते. त्यांना एकूण पाच मुले. त्यापैकी पाचवी मुलगी ताराबाई. बापूजी शिंदे हे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. त्यामुळे ताराबाईंच्या मनावर महात्मा फुलेंचा प्रभाव पडला होता. स्त्री-पुरूष समानतेचे बाळकडू बालवयापासूनच ताराबाईंना मिळाले होते. बापूजी शिंदेनीही ताराबाईंना चार मुलांच्या बरोबरीनेच समानतेची वागणूक दिली. तिला नवीन शिकण्यास उत्तेजन दिले.

उंची कमी असलेल्या ताराबाईंच्या डोळ्याला जाडभिंगाचा चष्मा असे. ताराबाई स्वभावाने तामसी होत्या. ताराबाई कोर्टकचेरीची कामे पहात. त्या घोड्यावर बसून शेतातील कारभार पहात. 'ताराबाईंच्या मनातून लग्नच करायचे नव्हते. पण त्यावेळचा जमाना व एकूण जनरीत ध्यानात घेऊन त्यांचे लग्न झाले.' [मालशे सं.ग. (१९७५) २] ताराबाईंना लग्नानंतर परक्या घरी जायला लागू नये म्हणून त्यांच्या वडिलांनी घरजावई करून आणला. ताराबाईंनी या पुस्तकात घरजावई करण्याबद्दल नाखुशी दर्शविलेली आहे. ताराबाई असे स्पष्ट करतात की, " कित्येक श्रीमंत गृहस्थ आपल्या लाडक्या लेकीचे फक्त लाडाकरिता व आवडीकरिता एखादे गरीबाचे मुलाबरोबर लग्न करून ते जोडपे

जवळच बाळगतात. पुढे जो पर्यंत ती उभयतां अज्ञान व असमजंस असतात तोपर्यंत बरे चालते. एकदा जरा चांगले समजू लागले म्हणजे ही बया श्रीमतांची सदा ऐषआरामीत वागलेली चतुर, हुशार, ती बाबा म्हणजे जन्मकरंट्याचे ..... रोज जे धिंडवडे होतात ते ते दृष्टीस पडतातच. तो बापाचा लाड तिला जन्मभर कामी येतो का नाही बरे?'' यावरून ताराबाईंचे स्वत:चे दु:खच स्पष्ट झाल्याचे दिसते. [मालशे (१९७५)२२] ' त्यांचा विवाह झाला खरा; पण पतीशी त्यांच पटलं नाही. संसारसुख त्यांना मिळालं नाही.' [भालेराव (२००८) ५] त्यांना राहिलेले बाकीचे आयुष्य एकट्यानेच कंठावे लागले.

ताराबाईंचे वाचन विस्तृत असल्याचे दिसून येते. त्यांना मराठी, इंग्रजी, संस्कृत या भाषा येत होत्या. त्यांच्यात लेखनविषयीचे गुण असल्याचे दिसून येते. 'पण प्रतिष्ठित घराणे, समाजात चमकण्याआड येणारी पडदपोषी व सांसारिक जीवनात झालेली कुचंबना यामुळे त्यांच्या अंगच्या गुणांचा प्रकाश पडावा तसा पडला नाही.' [मालशे -(१९७५) २] 'स्त्री-पुरुष तुलने' सारखे एकच पुस्तक त्यांनी लिहिले. ताराबाई अवतीभवतीच्या स्त्रियांचे जगणे, त्यांना स्वत:ला स्त्री म्हणून आलेले अनुभव यावर चिंतन करू लागल्या. त्यांनी पुराणे, समकालीन साहित्याचेही वाचन केले असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. याचे प्रत्यंतर त्यांच्या या पुस्तकातील ग्रंथचिकित्सेतून येते. यावरून ताराबाई ह्या व्यासंगी व बहुश्रूत असल्याचे पटते.

## 'स्त्री-पुरुष तुलना' लिखाणामागील पार्श्वभूमी

'१८८२ मध्ये ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक लिहिले. त्याचे कारण, कुटुंबात, समाजात जी वागणूक स्त्रीला मिळत होती ही त्यांना पाहवेना. ' [रानडे (२००५)३२३] ताराबाईंच्या 'स्त्री-पुरुष तुलना' लिहिण्यास एक कारणही घडले. आणि ते म्हणजे विजयालक्ष्मी खटला हे होय. 'या केससंबंधीचे सार्वजनिक विचारप्रकटन जर ताराबाईंच्या वाचनात आले नसते, तर त्यांच्या हातून कदाचित पुस्तकाचे लेखन झालेही नसते.' [खोले (१९९९)५४] त्यावेळी संपूर्ण देशभर विजयालक्ष्मी खटला गाजत होता.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सुरत येथील विजयालक्ष्मी नावाच्या २४ वर्षाच्या ब्राह्मण विधवा अनैतिक संबंधातून गरोदर राहते. विजयालक्ष्मीने भ्रूणहत्या करू नये यासाठी पोलिस मॅजिस्ट्रेटला कळवतात. विजयालक्ष्मी समाज भयास्तव भ्रुणहत्या करते. ही घटना समजल्यावर तीला मॅजिस्ट्रेटसमोर हजर केले जाते. भ्रुणहत्येचा आरोप ठेवून विजयालक्ष्मीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. पुढे मुंबई हायकोर्टात विजयालक्ष्मी अपील करते. त्यावेळी तिथे तिला जन्मठेपेची शिक्षा दिली जाते. विजयालक्ष्मी व इतर लोक या शिक्षेतून माफी मिळावी म्हणून मुंबई सरकारला अर्ज करतात. त्यावरून मुंबई सरकारने ता. १८ जुलै सन १८८१ रोजी शिक्षा रद्द करून ५ वर्षांची सक्त मजुरीची कैदीची शिक्षा विजयालक्ष्मीस दिली. [ खोले (१९९९) २०३,२०४] यावर पुणे वैभव सारख्या सनातनी वृत्तपत्रांनी टिकेची झोड उठविली. 'पुणेवैभव' वृत्तपत्रावर ताराबाई कडाडून टिका करतात. कारण पुणे वैभव वृत्तपत्र पुर्नविवाह कायद्यास विरोध करत होते. यानिमित्ताने संपूर्ण स्त्रीजातीवरच दोषारोप ठेवण्यात आले. पण हे करण्यास फशी पाडणाऱ्या पुरुषाची चर्चा मात्र कुठेच झाली नाही.

ह्या खटल्याची प्रसिद्धी त्यावेळच्या प्रत्येक वृत्तपत्रात करण्यात आली होती. ह्यातून जी प्रसिद्धी ह्या खटल्यास देण्यात आली, ते पाहून ताराबाई शिंदे अस्वस्थ झाल्या. समजबांधवांची स्त्री जातीकडे पाहण्याची अन्यायदृष्टी ही ताराबाईंना लेखनप्रेरणा मिळाली. त्यामुळे स्त्रियांवर पुरुषांकडून होणाऱ्या अन्यायाचे चित्र सत्यशोधकीय ताराबाई शिंदे यांनी दाखवून दिले. हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य होय. 'विजयालक्ष्मी खटला' हे तात्कालिक कारण आणि ताराबाईंची संस्कारी जडणघडण व संस्काराचा परिपाक म्हणजे 'स्त्री-पुरुष तुलना' हे क्रांतिकारक पुस्तक होय. [ भालेराव (२००८) ११ ]

ताराबाई शिंदे यांचे हे 'स्त्री-पुरुष तुलना' हे १९ व्या शतकातील असे एक लेखन आहे की, ज्यात एक स्त्री केवळ साहसानेच नाही तर सुसंगतपणे व तर्कशुद्ध पद्धतीने परखड शब्दात स्त्री-पुरुष नात्यासंबंधी व तिच्या अखंड शोषणासंबंधी पुरुषांना

सरळ सरळ प्रश्न विचारते आहे. हा निबंध विशिष्ट जाती किंवा कुळ याविषयी नसून ही 'स्त्री-पुरूष तुलना' आहे.

वर्तमानपत्रात छापून येणाऱ्या अबला स्त्रियांच्या दृष्कृत्याविषयीच्या विरोधात सर्व समाज मूग गिळून गप्प बसला होता. त्यावेळी ताराबाईच या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी स्वत:हून पुढे आल्या. विजयालक्ष्मी हा खटला या पुस्तकासंदर्भात खूप महत्त्वाचा आहे. विजयालक्ष्मीने केलेल्या भ्रुणहत्येनंतर त्या काळातील सर्वच वृत्तपत्रात स्त्रियांवर सर्वच गैरकृत्यांचा आरोप करण्यात आला. त्यावेळी स्त्री भोवतालच्या बंधनांनी जखडलेले जीवन पाहून ताराबाई अस्वस्थ झाल्या व ह्या वृत्ताने तर अन्यायी परंपरेविषयी स्वतंत्रपणे त्यांच्या विचार करण्याला खतपाणीच मिळाले.

'ताराबाई १९ व्या शतकातील स्त्रियांच्या स्थितीचे सूक्ष्म अवलोकन करतात, त्यांची परिस्थिती अशी होण्यामागील चिकित्सा करतात, त्यामागील पुरूषांच्या राजकारणाची निर्भत्सना करतात, आणि स्त्रियांच्या दैनंदिन जीवनात त्यांना त्यांचे स्थान कसे लाभेल याची त्या विवंचना करतात, हे कौतुकास्पद आहे.' [ खोले (१९९९) ६४] ताराबाई ह्या 'स्त्री-पुरूष तुलना' मध्ये स्त्री-पुरूष असमानता, शास्त्रकर्त्यांचा पुरुषीसत्तेला असलेला पाठिंबा, स्त्री-शोषण, स्त्री धर्म, विधवा जीवन, बहुपत्नीत्व ह्या लादलेल्या जीवनाचा मोठ्या प्रमाणावर निषेध करतात. त्यावरील प्रश्नांवर ठामपणे भूमिका मांडतात.

## ताराबाईंची 'स्त्री-पुरूष तुलना' हे पुस्तक लिहिण्यामागील भूमिका

'स्त्री-पुरूष तुलना' पुस्तक लिहिण्यामागील भूमिका ताराबाई प्रस्तावनेतच स्पष्ट करतात. त्या म्हणतात, "...रोज पुरूषांचे साहस, धाडस व दगाबाजीची नित्यनवी भयंकर कारणे दिसून येत असताही तिकडे कोणीच लक्ष न देता स्त्रियांवरच सर्व दोषांची गोणी लादतात. हे पाहून स्त्री जात्याभिमानाने माझे मन अगदी खळबळून, तळतळून गेले. त्यामुळे मला निर्भिड होवून असेच खडखडीत लिहिल्यावाचून रहावेना. तुम्ही एकसारखे



BAPP BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

सगळेच दगाबाज व कपटी आहात तेव्हा तुम्ही एकमेकांचे झाकून नेता ते उघडे करून दाखविण्याला याच्याहीपेक्षा कडक जर दुसरी भाषा असती तर ती देखील वाकडी तिकडी लिहिलीच असती.'' [ मालशे (१९७५) २,३] असे ताराबाई शिंदेंनी 'स्त्री-पुरुष तुलना' ग्रंथाचे प्रयोजन स्पष्ट केले आहे. स्त्री जातीला बदनाम करण्याच्या वृत्तीला कोणीच विरोध करत नसल्याचे ताराबाईंना जाणवले. त्या स्वत:हून त्या वृत्तीच्या विरोधी तळमळीने, कळकळीने पेटून उठल्या व त्या स्त्री अन्यायाविरोधी सरसावल्या. अत्यंत प्रक्षोभक शब्दात त्यांनी स्त्रियांची बाजू मांडली. व पुरुष वर्ग स्त्री जातीचे सर्वतोपरी शोषण करत असल्याचे या ग्रंथात विस्तारपूर्वक मांडले.

ताराबाईंचे 'स्त्री-पुरुष तुलना' लिहिण्यामागील प्रयोजन पाहता त्यांनी पुरुषांच्या तुलनेत स्त्रीला अन्यायी जीवन ज़गावे लागते, व समाजातील जे जे वाईट ते ते स्त्री मुळेच आहे. असा शास्त्रकर्ते व समाजाचा गैरसमज खोडून टाकण्यासाठीच ह्या ग्रंथाची निर्मिती केली. ताराबाईंनी पुस्तकाच्या प्रस्तावनेतच हे स्पष्ट केलेले आहे. ताराबाई लिहितात की, '' ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न केली, त्यांनेच स्त्री-पुरुष निर्माण केले. सर्व प्रकारचे साहस दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात किंवा अवगुण स्त्रियांचे अंगीही आहेत तेच पुरुषात आहेत, किंवा नाही हे स्पष्ट करून दाखवावे याच हेतूनें हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचिला आहे.'' [मालशे (१९७५)१]

ताराबाईंनी या पुस्तकात स्त्री-पुरुष भेदाच्या विविध पैलूंना स्पर्श केला आहे. त्यापैकी बालविवाह, सक्तीचे वैधव्य व विधवा पूनर्विवाहाला बंदी या प्रश्नांची नेमकेपणाने मांडणी ताराबाईंनी केली आहे.

## बालविवाह सक्तीचे वैधव्य व विधवा पुनर्विवाहाला बंदी इ. विषयीची ताराबाईंची भूमिका

विवाह हा स्त्रिच्या जीवनातील महत्त्वाची घटना, पण त्याकाळी लग्नव्यवहारात अर्थव्यवहाराला केंद्रस्थान होते. वधुपिता मुलीचे विवाहावेळी वर्तन कसे करतो यावर

ताराबाईंनी प्रकाशझोत टाकला आहे. त्यावेळी समाजात विवाहाच्या विविध तऱ्हा होत्या हे त्या सांगतात. " कित्येक बाप आपल्या नक्षत्रासारख्या १० –११ वर्षाच्या मुली ८०–९० वर्षांचे श्रीमंत म्हाताऱ्यास रुपयांची थैली घेवून व त्याचे श्रीमंतीवर नजर ठेवून नवरा मेला तरी चिंता नाही. इला पैशाला तर काही कमी नाही ना? दोन दिवस खाईल, पिईल, लेईल, नेसेल. एक नवरा नसला तरी काय चिंता आहे असे म्हणून वाघाला जशी बकरी दयावी त्याप्रमाणे बेधडक देतात. " [मालशे (१९७५) २०]

ताराबाई म्हणतात, "पुरुष जातीला एकीपासून पाचशे बायका करण्याची परवानगी दिली." [ मालशे (१९७५) १०] पहिली बायको आजारी आहे, तोवरच दुसरीची तयारी सुरू होते. ऐंशी वर्षांचा पुरुष असला तरी तोंडात दात नसले, केस पांढरे झाले असले तरी तोंडात दंतवैद्याकडून तोंडात बत्तीशी घालून, केसांना कलप करून लग्नासाठी तयार होतो. "हजार दोन हजार देवून सुरेख मृगनेत्रीचें लग्न त्या मढ्याबरोबरच करून द्यावे." [ मालशे (१९७५) ११] म्हणजेच कमी वयातील मुलीचा विवाह वयोवृद्ध माणसाबरोबर होतो. यातून त्यांना बालाजरठविवाहाची पार्श्वभूमी सुचवायची आहे हे जाणवते. म्हातारा नवरा मेला म्हणजे तरुणपणाचे प्रज्वलित इंगळ पदरात वागवून दिवस कशाप्रकारे काढायचे? असा येथे त्या प्रश्न उपस्थित करतात. विवाहबाबतीत स्त्रिच्या वाट्याला येणाऱ्या यमयातनांमुळे ताराबाईंचे मन विषण्ण झाले आहे.

"कोणाला लेकी फार असल्यामुळे आल्या वरास देतो." [मालशे (१९७५) २१] नवरा कितीही दुर्गुणी असेल किंवा जाच, हाणमार, खाण्यापिण्या विषयी हाल करणारा असेल त्या खाईत वडील आपल्या मुलींना ढकलतो. ज्याप्रमाणे गायीस कसाबाच्या हाती स्वाधीन करतात त्याप्रमाणे आपल्या मुली देतात. कौटुंबिक, आर्थिक परिस्थितीवर आई–वडील आपल्या मुली कोणाच्याही हाती सोपविताना आजही दिसून येतात.

त्याकाळी विवाहसारख्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनेला सामोरे जाताना मुलीचा त्यात तिचा स्वत:चा सहभाग कुठेच दिसून येत नसे. त्याविषयी तिला आपले मत

मांडण्याचा अधिकार व स्वातंत्र्य नसे. त्याविषयीचे सर्व अधिकार तिचे वडीलांच्या हाती असल्याचे ताराबाई दर्शवितात. बाला–जरठ विवाहामुळे तरूण वयातच मुलींना वैधव्य येते. परंतु स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार नसतो. याविषयीचे विवेचन ताराबाईंनी केले आहे. बालविवाह, पतीनिधनांतर सती जाणे/ विधवांनी केशवपन करून घेवून अंधारकोठडीत जीवन जगणे, विधवा पुनर्विवाहास बंदी अशासारख्या स्त्रियांचे जगणे असह्य करणाऱ्या प्रथा १९ व्या शतकात उच्चवर्णिय समाजात रूढ होत्या. अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्रय व उच्चवर्णियांच्या अनुकरणातून चालत आलेल्या कनिष्ठ परंपरा ह्यामुळे बहुजन समाजातील जनता विशेषत: स्त्रियांचे जगणे अतिशय त्रासदायक होते.

अशा परिस्थितीत स्त्रिया जीणे जगतच होत्या पण या विरोधात कोणतीही स्त्री उघड उघड भूमिका घेत नव्हती. म्हणून ताराबाईंनी आपल्या मनातील याविरोधी खदखदत्या भावनेला वाट करून दिली.

केवळ ब्राह्मण जातीतच पुनर्विवाह बंदी असताना इतर जातींनीही त्यांचे अनुकरण केले असून त्यांच्यात "ब्राह्मणांपेक्षाही पुनर्विवाह न होण्याची सक्ती दिसून येते." [मालशे (१९७५) १] मराठ्यांच्यात तर ही सक्ती अधिक दिसून येते. उच्च समाजातील लोकांच्या रूढी, परंपरा ह्या खालच्या जातीत सहजपणे कशा झिरपत गेल्या याविषयी ताराबाईंनी अचूक निरीक्षण केले आहे. [जोगळेकर (१९९१) ३३] अशाप्रकारे "पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोगांप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरली आहे. त्यामुळें किती लाखो व कोट्यावधी स्त्रिया वैधव्याचें असह्य दु:ख कसकसे भोगीत असतील, व भोगितात व त्यापासून अनेक अनर्थ होत आहे." [मालशे (१९७५)१] याचे कारणही त्या स्पष्ट करतात की, मनुष्य वस्तीत राहून मनोनिग्रह करून स्त्री धर्मरक्षण होणे अशक्य आहे.

स्त्रिला पुरूषाप्रमाणे पुनर्विवाहाचा हक्क नसल्यामुळे तिला आपल्या तारूण्यसुलभ आकांक्षा मारून जगावे लागते. ही पुनर्विवाहाची बंदी स्त्रियांच्या बाबतीतच का? असा

सवाल त्या सनातनी परंपरावाद्यांना परखडपणे विचारतात. विधवांना पुनर्विवाहाची बंदी केल्यामुळे अनेक दुष्परिणाम होतात. स्त्री विधवा झाली की, तिच्या माथ्यावर कायम अशुभाचा शिक्का बसतो. तिचे केशवपन करून तिला विद्रुपतेचा स्वीकार करावा लागतो. आयुष्याच्या शेवटपर्यंत तिला कष्टप्रद आणि अपमानी आयुष्य भोगावे लागते. पुरूषी विषयवासनेस बळी पडण्याचे भय ही अखंड रहाते. आणि अशा पद्धतीने तिला सांदीचे खापराप्रमाणे कुटुंबातील एक बटिक म्हणूनच जगण्याची सक्ती केली जाते. तिला धर्मशास्त्राने, समाजाने घालून दिलेली विधवांची बंधने पाळावी लागतात.

ताराबाई लिहितात, ''नवऱ्याआधी बायकोने मरावे किंवा नवऱ्याने बायको आधी मरावे याचा तुमच्या बापदाद्यांनी देवापासून काही दाखला आणला काय रे? मरणे किंवा जगणे हे तर त्या सर्व शक्तिमान नारायणाचे हाती..... त्याला ह्या स्त्रियांनी काय करावे...... तर जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे स्त्रियांनी आपली तोंडे अगदी एखाद्या महान खुन्यापेक्षाही महाजबर अपराध्याप्रमाणे काळे करून सर्व आयुष्यभर अंधारकोठडीत रहावे.' [मालशे (१९७५) ८] ''..........नवऱ्यामागे अगदी सर्व सृष्टी व्यवहार सोडून हरी हरी करीत (बायकोने) बसावे. तसे पुरूषाने का बरे करू नये? [मालशे (१९७५) १०]

'एकनिष्ठ जर मूल्य म्हणून स्वीकारायचे असेल तर ते उभयपक्षा लावले पाहिजे, हा ताराबाईचा दावा दिसतो.' [जोगळेकर (१९९१) १०] यावरून पुरूषाप्रमाणेच स्त्रिलाही पतीमागे जीवन जगण्याचा हक्क असल्याचे ताराबाई स्पष्ट करतात. 'ताराबाईच्या दृष्टीकोनानुसार सर्व विधवांना घर व पतीप्रेम मिळायला हवे.' [ ओहॅनलिन (१९९४) ११८ ]

ताराबाई येथे स्त्रिया ह्या स्वत:हून विधवा जीवन मागत नाहीत असे विवेचन करतात. नवऱ्याने किंवा बायकोने आधी मरावे हे त्यांच्या हातात नाही. ज्याप्रमाणे सावित्रीने पतीचे प्राण यमाजवळून परत आणले त्याप्रमाणे पुरूषांमध्ये आपल्या पत्नीचे प्राण मागण्यासाठी त्या रस्त्यावर कुणी गेले आहे का? असा सवाल त्या येथे करतात.

विधवा स्त्रियांना अंधारकोठडी जवळ करावी लागते. मग पुरूषानेही आपले तोंड काळे करून अरण्यवास का पत्करू नये? असे त्या विचारतात. स्त्रियाही मानवच आहेत लोखंडाच्या नाहीत असे स्पष्ट करण्यामागे ताराबाईंचा उद्देश विधवापणी सोसाव्या लागणाऱ्या यातना स्पष्ट करणे हा आहे.

केशवपन संदर्भात त्या पुरूषांना उद्देशतात, "पतीराज एकदा स्वर्गवासी झाले म्हणजे या बाईसाहेबांचे हाल कूत्रेही खात नाही. त्यांच्या कपाळी काय तर माथ्यावरील सर्व कुरळे केसांवर नापिकाचा हात फिरला म्हणजे तुमचे डोके थंड झाले. सर्व अलंकार गेले, सुंदरपण गेले म्हणजे काय तर तीला सर्व तऱ्हेने उघडे करून देशोधडी लावायचे. तिला लग्नकार्यात समारंभात जे काही सौभाग्यकारक त्यात तिला जाण्याची बंदी का? तर तिचा नवरा मेला ती करंट्या कपाळाची, तिचे तोंड पाहू नये अपशकुन होतो." [मालशे (१९७५) ९]

त्याकाळी पुनर्विवाहबंदी प्रमाणेच बहुपत्नीत्वाची चालही मोठ्याप्रमाणात चालू होती. पत्नी जीवंत असो वा नसो पुरूष अनेक विवाह करीत. त्यामुळे स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच झाला होता.

ताराबाई यावर पुरूषांच्या पुन:पुन: विवाह करण्याच्या वृत्तीवर परखड टिका करताना दिसतात. त्या पुरूषांना स्पष्टपणे जाब विचारतात की, पुरूषाला अनेक पत्नी करण्याचा अधिकार असेल तर स्त्रिला अनेक पती का करता येवू नयेत? किंवा "तुमच्या बायको मेल्या, म्हणजे तुम्ही त्यांच्याबरोबर का सती जाऊ नये?" [मालशे (१९७५) २०] असा प्रश्न त्या पुरूषांना विचारतात. उलटपक्षी, स्त्रिया ह्या संसारात पुरूषांपेक्षाही श्रेष्ठ असतात. असे त्या मत मांडतात. संसाराचा गाडा ओढायचा तर पुरूष मेलेला परवडतो. पण बाई संसाराला असणे गरजेचे असते. हे मांडताना त्या विधवेची स्थिती पाहून म्हणतात, "तुमच्यापेक्षा ती सती गेल्याने फार नुकसान होईल. कसे म्हणाल तर ती मेली म्हणजे तिच्यामागे तिची लहान मुले असतात. त्यांना कोणी

सांभाळावे? अशी म्हण आहे, 'घोडे करिता बाप मरावा पण रहाटाने सूत कातणारी आई मरू नये.' बाप मेला तर ती आई पाहिजे तसे दु:ख सोसून मुलांना पोशील पण तुमी आज ती मेली की उद्या दुसरी करून त्या मुलांस देशोधडी करता. याकरिता बायकोच्या आधी तुम्हालाच त्या कुंडात टाकावे.'' [ मालशे (१९७५) २०] यावरून पुरूषांपेक्षा स्त्री असणे कुटुंबासाठी अत्यावश्यक असल्याचे त्या पटवून देतात. ताराबाईंचा हा 'युक्तिवाद वाचताना असे वाटते की, स्त्री समानतेच्या दाव्यातील त्या स्त्री जातीच्या जणू वकिलच झालेल्या आहेत.' [जोगळेकर (१९९१)१४] पुरूषाने कुटुंबाचा विचार करून मर्यादेनुसार वर्तणूक करावी असे यावरून त्या स्पष्ट करतात. बायकांनी सती न जाता मुलाबाळांचा सांभाळ करण्यासाठी मागे राहिले पाहिजे. विधवेला पुनर्विवाह करण्यास मनाई आणि पुरूषाला मात्र अनेक बायका करण्याची परवानगी या विरोधाभासाचा त्यांनी उपहास केला आहे.

**स्त्री धर्माविषयीची ताराबाईंची भूमिका**

ताराबाईंनी विवाहीत स्त्रियांचे स्वातंत्र्य स्पष्ट दाखवून दिले आहे. पुस्तकाच्या सुरूवातीसच स्त्रीधर्माबाबतीत त्या म्हणतात, ''स्त्रीधर्म म्हणजे काय? निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्यांचे मर्जीप्रमाणे वागणे, त्यांनी लाथा मारिल्या, शिव्या दिल्या.... नवरूजी दारू पिऊन, जुवा खेळून कपल्लक होवून, चोरी करून कोणाचा प्राण घेवून.... लाथ खावून जरी घरी आले तरी स्त्रियांनी आपले.... जसे कोणी कृष्णमहाराज गवळ्यांचे दहिदूध चोरून चन्द्रावलीस कलंक लावून आलेत असे समजून परमात्म्यासारखीच यांची मोठ्या हसतमुखाने देवासारखी पूजा करावी....... हा स्त्रीधर्म.'' [ मालशे (१९७५)१] हा स्त्रीने धर्म पाळलाच पाहिजे अशी सक्ती होती असे त्या स्पष्ट करतात. पुरूष कितीही गुन्हे करून आला तरी स्त्रीने त्याची पूजा करावी, पति म्हणजे स्त्रीचा देव असा संकेत त्या काळी होता. त्याच्यापेक्षा स्त्रीचे स्थान कमीच असायचे.

'पतीनिष्ठा, आज्ञापालन, सेवापरायणता, त्याग, समर्पणशीलता, पतीच्या शरीरसुखाची पूर्तता या गुणांचा परमोत्कर्ष साधणे यातच स्त्रीजिवीताचे साफल्य साठविले आहे, हे त्या काळात स्त्रियांच्या मनावर बिंबवले जाई. सर्वसामान्यपणे जे अवैध मानले जात होते, ते जरी पतीने करावयास सांगितले तरी 'आदर्श पत्नी' पतीच्या त्या आज्ञेचेही पालन करते, कारण स्त्रीधर्म हा योग्य अयोग्यतेच्या विवेकावरही मात करतो. अशी त्या काळातील समजूत होती.' [ खोले (१९९९) ३४] स्त्रियांचे समाजाने लावलेली व्यवस्था म्हणजेच पतिव्रता धर्म किंवा स्त्रीधर्म होता. आणि या व्यवस्थेचे पालन करणे हे स्त्रियांचे कर्तव्य व तोच त्यांचा जिवित हेतू मानण्यात येत असे. परंपरेने आणि धर्मशास्त्रानेही तो निश्चित व नि:संदिग्ध केला असल्याचे दिसून येते.

याविषयी ताराबाई म्हणतात, ''जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूक देखील देवाप्रमाणेच पाहिजे.'' [ मालशे (१९७५)२] नवऱ्याने ही बायकोवर असे प्रेम करून तिचे सुख-दु:ख जाणून घ्यावे. पण जर असे होत नसेल तर नवऱ्याला देव कसे मानावे? असा त्या पुरुषांना सवाल करतात. 'ताराबाईंच्या शैलीतील धीटपणा व स्त्रीला बटिक मानणाऱ्या पुरूषांविषयीची चीड विशेष नोंद करण्यासारखी वाटते.' [जोगळेकर (१९९१) ३]

याठिकाणी ताराबाई स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा विचार करताना दिसतात. मात्र स्वातंत्र्याचा स्वैराचार होवू नये. याची दक्षताही ताराबाई घेतात. पुरुषांच्या तुलनेत स्त्रिचे संसारातील स्थान व दर्जा स्पष्ट करतात. व पुरूषाने स्त्रीकडे ममतेने पाहिले पाहिजे हा बायकोहक्कही त्या दर्शवितात.

'स्त्रीजातीविषयी अभिमान' आणि 'स्त्री धर्म' किंवा 'पातिव्रत्य' या मुळात अन्याय करणाऱ्या समाजिक रचना आहेत, ही समज या ताराबाईच्या विचारांच्या मुख्य दिशा होत्या. [ऑम्व्हेट (१९९८) २३]

**स्त्रीचे शोषण**

१९ व्या शतकात पुरूषसत्ता किती टोकाला गेली होती हे ताराबाईच्या 'स्त्री-पुरुष तुलना' वरून दिसून येते. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीचे शोषण होत असते, हे ताराबाई मांडतात. स्त्रीबाबत कोणत्याही विषयावर विचार केला तर त्यातून स्त्रीचे पुरूषसत्तेकडून होणारे शोषणच दिसून येईल. चालत आलेल्या परंपरा, रूढी या सर्वातून स्त्रिचे शोषण करणे हाच हेतू असल्याचे ताराबाई दर्शवितात. ज्या काही रूढी, परंपरा, चाली आहेत त्या सर्वांतून पुरुषसत्ता बळकट करून स्त्रीशोषण केले जाते असे ताराबाईंचे मत होते.

लग्नविषय स्त्रियांचे आयुष्य बदलून टाकणारा विधी असतो. पण त्याविषयी मत मांडण्याचे बोलण्याची सत्ताही स्त्रिला नसते. तिला व्यक्तिस्वातंत्र्य नसते. असे प्रतिपादन ताराबाई 'स्त्री-पुरूष तुलना' मध्ये करतात. तसेच स्त्री हट्टाप्रमाणे एखादा हट्ट केला तरी तिला पाट सोलून घ्यावी लागते. निमुटपणे सोसावे लागते, राबावे लागते, आणि त्याबरोबरीनेच सत्ताहिनताही वाट्याला येते. याची ताराबाई रोखठोक मांडणी करतात.

"स्त्रिया निरंतर संसारात नानाप्रकारचे कष्ट, हाल, तहाणभूक, जाच हाणमार सोसून फक्त एक तुमच्या गोड शब्दाच्या भूकेल्या असतात. तुम्ही कमावून आणणार पण त्यांची पुढे सर्व व्यवस्था लावून तुमचे मर्जीप्रमाणे वागून सदासर्वदा अध्यावचनात अज्ञांकित राहून या शरीराचे रतिरति तुकडे पाडून................ अतोनात कष्ट करून सदा तुमच्या मुखाकडे नजर." [ मालशे (१९७५) १५] असे असूनही त्यांच्या वाट्याला लाथाबुक्या व निंदा, विशेषण येतात. हे पाहून ताराबाई म्हणतात, "आजन्मपर्यंत बटकीप्रमाणे ताबेदारीत राहून सदासर्वदा नवऱ्याची मर्जी, अतिनाजूक, ताजव्याचे काट्यासारखी तोलून, घरातील सर्व मनुष्याचे जे नाही ते सर्व बोलणे व कष्ट सोसून घरातील गाड्याचे बैलासारखे राबून हरिण सशासारखी रात्रंदिवस जनांची घरच्यांची भिती


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

बाळगून वागत असताही स्त्रियांना एक शब्द बोलण्याची अगर चिमटीभर दाण्याची सत्ता नसावी काय रे? ” [ मालशे (१९७५) १६]

यातून स्त्रिच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा पूर्णपणे संकोच झाल्याचे दिसून येते. ‘घर हे स्त्रीचे क्षेत्र मानले जाते पण घरावर, त्यातील मालमत्तेवर स्त्रियांना हक्क नव्हता. ह्याविषयी ताराबाई खंत व्यक्त करतात.’ [जोगळेकर (१९९१) ९] संसारात वावरताना स्त्रिला घरातील सर्वांच्या मतानुसार रहावे लागे. त्यांना सर्वांची मर्जी सांभाळावी लागत. कितीही कष्ट, त्रास सहन करावा लागला तरी गप्पच रहावे लागे. ‘सर्वसामान्य स्त्रियांच्याबाबतीत मात्र घरोघरीच्या पुरुषाची सर्वतोपरी सेवा करणाऱ्या म्हणूनच स्त्रियांना अस्तित्व होते. स्त्रिचा वस्तुवत विचार करणे ताराबाई शिंदे यांना अतिशय संतापजनक वाटतो.’ [ खोले (१९९९) ३७]

अशाप्रकारे स्त्रीचे प्रत्येक बाबतीत शोषण केले जात होते. तिच्या वाट्याला सत्ताहीनता दुय्यमत्व, स्वातंत्र्याचा अभाव असे जे जीवन आले आहे त्याविषयी ताराबाई प्रश्न विचारतात.

**पुरुषश्रेष्ठत्वाच्या अहंकारावर हल्ला**

‘स्त्री-पुरुष तुलना’ पुस्तकातील निम्म्याहून अधिक भागात पुरुषांच्या ठायी असणाऱ्या दुर्गुणांची मिमांसा ताराबाईंनी केली आहे. पुरुष दगाबाजी करून स्त्रियांना फसवितो. व आपल्या दुष्कृत्याचे ओझे स्त्रीवर लादतो. त्यामुळे स्त्रिला वाईट प्रसंगांना सामोरे जावे लागते. स्त्रीवर अन्याय होतो. समाजही दृष्कृत्यांना स्त्रिलाच जबाबदार धरतो असे यातून दर्शवितात. स्त्रियांच्या वाईट, वर्तणुकीमागे पुरुषच कसे जबाबदार आहेत. व स्त्रियांपेक्षा पुरुषांतच अधिक अवगुण कसे आहेत ते ताराबाईंनी अनेक उदाहरणे देवून स्पष्ट केलेले आहे. तसेच सर्व शास्त्रेही नुसती पुरुषानुकुल आहेत असे नाही तर ती स्त्रीविरोधी आहेत असाही त्या आरोप करतात.

पुरूषांना त्या उद्देशून म्हणतात की, 'प्रथम पुरूष स्त्रियांना गोडगोड बोलून नादी लावून एकदा घराबाहेर घराचा उंबरा पारखा करतो. व नंतर तिला तिचे नशिबावर सोडून देतात. तिचा उपयोग असेल तोवर तिला जवळ करतात.' [ चक्रवर्ती (१९९८) २५१] ती एक व्यक्ति म्हणून तिच्याकडे पाहिले जात नव्हते.

पुरूषांची मुळ दुर्गुणी प्रवृत्तीच कोणतेही दुर्गुणामागे, गुन्ह्यामागे असते हे सर्व प्रकारचे 'दुर्गुण–साहस' पुरूषांच्या अंगी असूनही स्त्रीचीच बदनामी होते. याबद्दलची चीड असल्यामुळेच पुरूषांची मुळ दुर्गुणी स्वभाववृत्तीच या दुर्गुणांमागे असते. अशी ताराबाई भूमिका घेतात. पुरूषांच्या विषयलोलूपतेवर ताराबाईंचा सर्वाधिक कटाक्ष असल्याचे दिसून येते. त्याकरणानेच पुरुष स्त्रियांना नादी लावून फसवितात, स्त्रिया संकटात येतात, त्यांच्या हातून गुन्हे घडतात, व त्यांना शिक्षा दिली जाते. त्याविषयी त्यांच्यावर आरोप करून त्यांना बदनाम केले जाते. त्यामुळे स्त्रियांच्या दुर्वर्तनास पुरूषच जबाबदार असल्याचे नि:शंकपणे ताराबाई भूमिका मांडतात.

ताराबाई येथे स्पष्ट करतात की, हे दुर्गुण स्त्रियांत जेवढ्या प्रमाणात असतात. त्याच्या कितीतरी पट अधिक ते पुरूषात असतात. ह्यातले बरेचसे दुर्गुण स्त्रियांच्यामध्ये येण्याला पुरूषच कारणीभूत आहेत. पुरूषप्रणित मूल्यव्यवस्था व स्त्रियांच्या वाट्याला असलेली असह्य निराधार परिस्थिती त्यामुळे दोषांचे खापरपण स्त्रियांच्याच माथी बसते. पण स्त्रियांना नावे ठेवण्याचा, हीन लेखण्याचा, कोणताही अधिकार पुरूषवर्गाला नसल्याचे ताराबाई मत मांडतात.

पुढे त्या स्पष्ट करतात की, स्त्रिया ह्या मूर्ख अशिक्षित आहेत. "त्या अविचारी असूनही तुमच्यापेक्षा बऱ्या. तुम्ही शहाणे आहात खरे पण इकडे कारागृहात जाऊन पहावे तो पाय ठेवण्यास देखील जागा मिळत नाही." [ मालशे (१९७५)१८,१९] कोणी खोट्या नोटा छापल्या, कोणी लाच खाल्ली, कुणी कुणाची बायको पळवून नेली, कोणी बंडात सामील, कोणी राजद्रोह केला, कोणी खोटी साक्ष दिली, खून केले अशी अनेक

कारणाने पुरूषांना कारागृहात घातले. ताराबाई इथे पुरूषांना सवाल करतात की, असे अनेक गुन्हे स्त्रियांच्या हातून घडतात का? पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचे गुन्हे कमी आहेत.

ताराबाई शिंदे म्हणतात, " तरी जगातील सर्व स्त्रिया प्रखर सूर्याच्या तेजाप्रमाणे सतेज अंतर्बाह्य गंगाजलाप्रमाणे निर्मळ आहे असे मुळीच नाही." [मालशे (१९७५) १६] अज्ञान, मुर्खपणा, अंधश्रद्धा, चंचलता, लबाडी, मत्सरीपणा इ. अनेक दुर्गुण त्यांच्यातही असतात. हे पण त्या नाकारताना दिसत नाहीत.

"टाळी दोहोंहातांनी वाजते खरी, पण त्यातून उजव्या हाताचा जोर जास्त असतो." [ मालशे (१९७५) २२ ] असे स्त्री पुरुष दोन्हीही चुकतात, पण त्यात पुरूषांचा सहभाग जास्त असल्याचे त्या स्पष्ट करतात. 'नभूतो भविष्यती' असे अविचार घडून व रोज घडत असताही ते स्वत:ला विचारी म्हणतात. याविषयी ताराबाईंना राग येतो व त्या रागातच पुरूषांवर अतिशय कडक भाषेत टिका करतात.

ताराबाई येथे समाजातील स्त्री व पुरुष यांचे स्थान वेगवेगळे दर्शवितात. 'स्त्रीचे तत्कालिन समाजातील कनिष्ठ स्थान आणि तिच्या वाट्याला आलेली गौण भूमिका याचे विवेचन करता करता स्त्रिची महती वर्णन करतात. तसेच पुरुषाचे तत्कालिन समाजातील वरिष्ठ स्थान व त्यात्या वाट्याला आलेली प्रधान भूमिका वर्णन करीत करीत त्या पुरूषांतील दोषांचे दिग्दर्शन करतात. अशा प्रकारे एका अर्थी पदांचे स्थानांतर घडवून त्यांनी खरे चित्र कसे आहे, ते येथे ध्वनित केले आहे.' [ खोले (१९९५) ५१]

## पुरूषसत्ता

ताराबाई पुरूषांना दुर्गुणांचे वसतिस्थान म्हणतात. ताराबाई स्त्रियांवरील अन्याय, तिचे गौणत्व स्पष्ट करण्याची एकही संधी सोडत नाहीत.

पुरूष वर्चस्व स्वीकारणारा समाज पुरूषप्रधान कुटुंबसंस्था, पुरूषरचित सामाजिक आचारविचारांचे नियमन करणारी शास्त्रे व धर्म, सर्व अर्थव्यवहारांचे अधिकार पुरूषाकडे असतात. न्यायसंस्था व राज्यसंस्था, शिक्षणव्यवस्था, तत्कालीन

संपर्कमाध्यमेही पुरूषांच्या स्वाधीन असतात. अशा स्थितीत स्त्री दबली जाते असे ताराबाईंचे स्पष्ट मत आहे.

पुरूषांचे स्त्री वरील वर्चस्व त्या अनेक उदाहरणे देवून स्पष्ट करतात. त्या लिहितात की, ''नवऱ्याने आंघोळीचे नाव घेतले की, बायकोने पाट मांडून घंगाळात ऊन पाणी विसावून पाय घासण्याकरिता तयार उभे रहाणे.'' [मालशे (१९७५) २]नेहमीच्या वेळेतच जेवण तयार ठेवणे, विड्याचे नाव घेताच विडा हजर करणे अशी पतीची आज्ञा होताच ती वस्तू पतीसमोर पत्नीला हजर करावीच लागते. यावरून ताराबाईंना पुरूषसत्तेचे, पुरूषप्रधान समाज व्यवस्थेची चांगली जाणीव झाली होती असे म्हणावे लागेल.

## स्त्री–पुरूष परस्पर पुरकता

ताराबाई स्त्री पुरूषांची तुलना करताना स्त्री–पुरूषांचे सहअस्तित्व स्पष्ट करतात. ताराबाई स्त्री–पुरुष दोघांचीही समाजाला आवश्यकता असल्याचे सांगतात. त्या म्हणतात, ''ईश्वराने स्त्री–पुरूष जोडा स्वेच्छेनेच नेमिला आहे. प्रत्येक गोष्टीला जिनसेला दुसरा त्याच जोडीचा मुकाबला असतो. त्यावाचून शोभा येतच नाही. जोडीवाचून कोणतेच काम नाही. तेव्हा हा संसार तुम्ही स्वत: चालवाल का? प्रपंचाचे शेत तुम्ही एकटे नांगराल काय?...... ही य:कश्चित अबला हिच्या एक नेत्रकटाक्षानेच तुमचे सर्व धैर्य, तेज, विरश्री गळून जाऊन लागलेच तिचेपुढे धावता..... यात काही मोठा पुरषार्थ नाही. '' [मालशे (१९७५) ६,७] अशाप्रकारे त्या स्त्रीचे सामर्थ्य स्पष्ट करतात. निसर्गत:च पुरूषाला स्त्रीचे आकर्षण असते ही तीची एक नैसर्गिक शक्तीच आहे. आणि स्त्री ही ह्या शक्तीच्या बळावरच पुरूषाला बांधून ठेवते असे त्या येथे मत मांडतात.

स्त्री पुरुषात स्त्री पराक्रमी आहे असे ताराबाई म्हणत असल्यातरी 'संसारात नाना प्रकारचे कष्ट उपसणारी हाल अपेष्टा सोसणारी, मारहाण सहन करणारी, पुरुषाच्या

(नवऱ्याची) गोड शब्दांची भुकेली असणारी व त्याच्या अर्ध्या वचनात राहू इच्छिणारी विनम्र पत्नी त्यांच्या मनात आहे.' [ खोले (१९९९) ४५ ]

ताराबाई पुरूषांना जाब विचारतात की, स्त्री " ही अर्धांगी शक्ती आहे. जर पाहू बरे तुम्हाला अर्धांगवायू होवून अर्धे शरीर गेले, तर मग एका हाताने तुम्ही काय कराल?" [मालशे (१९७५) ३७] स्त्री किंवा पुरूष हे परस्पर आनंदासाठी परमेश्वराने निर्माण केले आहेत. [मालशे (१९७५) ३६] स्त्रिशिवाय पुरूषाला महत्त्व नाही. ज्या घरात स्त्री नसेल तर ते घर स्मशानासारखे भासते असे ताराबाई स्त्रीचे महत्त्व स्पष्ट करतात. त्याप्रमाणेच स्त्रिला पुरूषाच्या सहकाराची साथीची आवश्यकता असते. स्त्रिची पुरूषाला सोबत नसेल तर त्याला कोणी जोड्याजवळदेखील उभे करणार नाही. असे त्या स्पष्ट करतात. "सर्वात वर्चस्व स्त्रीचे आहे कारण सगळेच तिचे स्वाधीन असते तिचे करिताच सारे वैभव." अशाप्रकारे ताराबाई स्त्री-पुरूषांची परस्परपुरकता स्पष्ट करतात.

स्त्री-पुरूषांचे निसर्गदत्त कार्य व कर्तव्य वेगवेगळे असले तरी दोन्ही गोष्टी समान महत्त्वाच्या व परस्परपूरक आहेत. तेव्हा स्त्री पुरूष दोघांनी परस्परांविषयी समान आदर ठेवला पाहिजे. समान निष्ठा जपल्या पाहिजेत, समान हक्क, समान बंधने स्विकारली पाहिजेत. समाजात स्त्रियांना समान दर्जा प्राप्त झाला पाहिजे. अशी ताराबाईंची भूमिका दिसते. स्त्री-पुरूषांनी परस्पर प्रेमाने आनंदाने रहावे. स्त्री-पुरूषात श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद नसावा असे ताराबाईंना मनापासून वाटते.

### स्त्री-पुरूष नात्याबाबत दृष्टीकोन

ताराबाई स्त्री-पुरूष नात्यातील असमतोलावरही प्रकाश टाकताना दिसतात. त्या म्हणतात, लग्नाचेवेळी परिस्थितीवश स्वीकारलेली पत्नी पुरूषाला आवडेनाशी वाटली तर तो दुसरा विवाह करतो. पण असे स्वातंत्र्य तिला नसते. हे पटवून देताना ताराबाई म्हणतात, "तुम्हाला जशी वाईट कुरूप दुर्गुणी गावंढळ बायको आवडत नाही तसा बायकोला नवरा आवडेल का? जशी तुम्हाला बायको चांगली पाहिजे तसा तिला चांगला

नवरा नको का?'' [मालशे (१९७५) २३] 'येथे स्त्री-पुरूष नात्यातील असमतोलोकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.' [ खोले (१९९९) ४४]

स्त्री नवरा जसा असेल तसा ती स्वीकारते, तर पुरूषानेही एक पत्नीव्रत पाळावे. अनेक बायका करून बायकां-बायकांत सवति मत्सर वाढविला जातो, असे ताराबाई म्हणतात. दोघी सवतींना समसमान वाढविणारे मुळीच दिसत नाहीत. एकसारखी दोघींवर प्रीती असणार नाही. "कारण प्रीती काही आंबा, जांब नाही म्हणून वाटून घेता येईल. प्रीती ही केवळ दुधाप्रमाणे आहे. दुध एकदा नासले म्हणजे जसे त्याचे फिरून दूध होत नाही तशी ही प्रीती एकदा फाटली म्हणजे ती पुन्हा कधी जुळत नाही.'' [ मालशे (१९७५) २१] ताराबाई येथे स्त्री पुरुष नात्यातील प्रेमभावना दर्शवितात. पती-पत्नीचा एकमेकांवर विश्वास असणे संसारासाठी आवश्यक असते.

पती-पत्नीचे नाते हे सामाजिक नाते आहे. ते निसर्गनिर्मित नसून समाजाने निर्मिलीले नाते आहे. आणि या असमान नात्यातील शोषणाकडे ताराबाईंनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. [खोले विलास (१९९९) ४४] स्त्री-पुरूष हे एकमेकांना अरिहार्य आहेत. स्त्री व पुरूष हे एकमेकास पुरक आहेत. तर स्त्रीवरच अन्याय का होतात? असा प्रश्न ताराबाई विचारतात.

## स्त्री शिक्षणाची आवश्यकता

ताराबाईंनी स्त्री शिक्षणाकडेही लक्ष वेधले आहे. स्त्रियांना शिक्षणापासून पुरूषांनीच वंचित ठेवले आहे असे त्या मानतात. "स्त्रिया अज्ञानी आणि भोळ्या असल्यामुळे त्या अन्याय सहन करतात व त्या घराबाहेर पडल्या तर तेथेही इतर स्त्रिया अज्ञानी असल्यामुळे त्यांना ज्ञान व शहाणपण येत नाही'' असे ताराबाई म्हणतात.

"तुम्ही असे अट्टल हुशार कोल्हे तरी इंग्रज सरकारचे राज्य झाल्याचून स्त्रियांना विद्यादान देवून त्यांची मने नेहमी सर्व मानसिक व व्यावहारिक प्रसंगात धैर्याने रहाण्यास पुष्कळ तऱ्हेने बळकट झाली आहेत. त्यामुळे त्याचे हृदयात जे अज्ञान वसत होते. ते

जाऊन त्यांना आता आपले बरेवाईट, कोणाशी कसे वागावे हा संसाराचा गाडा कसा हाकावा, स्वधर्म पातिव्रत्य याविषयी चांगले समजू लागले व त्यामुळे आपले भरत खंडाची स्थिती काही दिवसांनी अगदी बदलून जाईल." [ मालशे (१९७५) १२] ताराबाई येथे संसाराची अर्धी जबाबदारी पार पाडणारी म्हणून स्त्रीची समान प्रतिष्ठा गृहीत धरतात, आणि ही जबाबदारी स्त्री शिक्षणाने पूर्ण करू शकेल असा त्या विश्वास व्यक्त करतात. [जोगळेकर (१९९१) १५]

शिक्षण हे अर्थार्जनासाठी व स्त्रियांना पुरूषाबरोबरीची समान प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी असते. हा आजचा विचार ताराबाई करताना दिसत नाहीत. उलट ताराबाई स्त्री-पुरूष संबंध सुधारण्यासाठी स्त्री-शिक्षण गरजेचे आहे असा विचार मांडतात. अशाप्रकारे 'समाजातील स्त्री -पुरूष नात्याचा इतक्या बारकाईने विचार करणाऱ्या ताराबाईच्या पुस्तकात स्त्री-शिक्षणाचा विचार विशेषत्वाने का झाला नाही ते उमगत नाही.' [खोले (१९९९) ६३]

## कायद्याची आवश्यकता

१९ व्या शतकात स्त्री प्रश्नाबाबतीत इंग्रज सरकारने भारतीय समाजसुधारकांच्या मागणीनुसार कायदे केलेले होते. त्याविषयी ताराबाईंही मत मांडतात.

ताराबाई स्त्रियांना दास्यातून सोडविण्यासाठी पुरूषश्रेष्ठत्वाची कल्पना नष्ट करून स्त्री-पुरूष समानता, स्त्री शिक्षण या गोष्टींबरोबरच कायद्याची आवश्यकताही प्रतिपादित करतात. परकीय राज्यसत्तेने ते कायदे केलेले असले तरी त्यांची आवश्यकता असल्याचे ताराबाई स्पष्ट करतात.

पूर्वापार चालत आलेल्या वाईट रूढी बंद पाडण्यासाठी कायद्याची आवश्यकता स्पष्ट करतानाच ताराबाई कायद्याची मर्यादाही स्पष्ट करतात. साक्षी पुराव्याच्या अभावामुळे स्त्री-पुरूष चोरट्या संबंधात पुरूष सहजपणे सुटू शकतो व स्त्रीवर अन्याय केला जातो अशी कायद्याची मर्यादेची बाजूही ताराबाई विचारात घेतात. [जोगळेकर (१९९१) १७]

## अधंश्रद्धाविषयक विचार

समाजात असणारे दुय्यम स्थान व कुटुंबात नसलेले महत्त्व यामुळे स्त्री दबली होती. त्यातच पतीचे प्रेम व मुल नसले तर तिची अवस्था खूप वाईट होत असे. पतीप्रेम व मुल प्राप्त होण्यासाठी स्त्री कोणतीही पूजा–अर्चा, उपास करायला तयार होई. समाजात व कुटुंबातील आपले स्थान रहाण्यासाठी, महत्त्व मिळविण्यासाठी त्याकाळी महिला अंधश्रद्धांना बळी पडत.

याबाबत ताराबाई स्पष्ट करतात की, स्त्रिया या स्वभावाने हवेखोर व भोळ्या असल्याने संतती संपत्ती व नवऱ्याची प्रिती संपादन करणाऱ्याकरिता त्या बैरागी, भोंदूंचे ऐकून अंधश्रद्धेचे पालन करतात. उपास, व्रतवैकल्ये आपलीशी करतात. "त्या अशा प्रकारचे साहस फक्त मुलाचे आशेने आणि नवऱ्याची मर्जी आपणाकडे निरंतर रहावी या हेतूने करतात." [मालशे (१९७५) २५,२६] कारण स्त्रियांना त्याकाळी पती व मूल हे दोनच जीवनाधार सामाजिक व कौटुंबिक प्रतिष्ठा व सुखप्राप्तीसाठी उपलब्ध होते. स्त्रिच्या व्यक्तिगत बुद्धीमत्ता वा कर्तृत्व ह्याला स्वतंत्रपणे स्थान नव्हते. स्त्रीच्या जीवनाला पोतेऱ्याइतकी किंमत नसल्यामुळे त्या अंधश्रद्धांना बळी पडत असत. [जोगळेकर (१९९१) २७]

## पुरूषवर्चस्वास शास्त्रकर्ते जबाबदार

स्त्रीविषयी उपेक्षेची, हीनतेची वृत्ती असण्यापाठीमागे त्याकाळी धर्मग्रंथ व पुराणग्रंथांचा समाजावर असलेला प्रभाव हे प्रमुख कारण होते. हे कारण जाणूनच ताराबाई आपल्या 'स्त्री–पुरुष तुलना' निबंधात स्त्रियांवरील अन्यायाबद्दल पुरूष व शास्त्रकर्तेंना जबाबदार धरतात.

स्त्रीही गृहलक्ष्मी न राहता गृहबंदी शाळेतली एक बटिक बनली होती. त्यास कारण म्हणजे हिंदूंची शास्त्रे व धर्माच्या नावाखाली चाललेल्या रुढी हिंदू शास्त्रांनी स्त्रीवर अनेक मार्गांनी बंधने लादली होती. पण पुरूषांना मात्र रान मोकळे सोडले होते. यामागील कारण

ताराबाईच्या स्पष्टीकरणावरून जाणवते ते म्हणजे पुरूष व स्त्री यामध्ये पुरूषाला श्रेष्ठत्व व स्त्रीला गौणत्व देण्याचे कारण सत्तासंबंधावर आधारित आहे.

साहित्य व वृत्तपत्रांतून मांडलेले दुर्गुणी स्त्री चित्रणामुळे ताराबाई असमाधानी झाल्या होत्या. त्यात स्त्रीच्या वर्तनाबाबत घालून दिलेले नियम, त्यांना प्रोत्साहन देणारा शास्त्राधार यामुळे स्त्रियांना व पुरूषांना वेगवेगळा न्याय का? असा ताराबाईंना प्रश्न पडतो. येथे ताराबाई ऋषीमुनींवर टिका करतात की, " कोणी हरणीचे पोटी झाले; ते काणे शृंगऋषि, कोणी पाखराचे पोटी झाले; ते भारद्वाज, कोणी गाढवीचे पोटी झाले; ते गर्धभऋषि, गायीचे पोटी झाले ते वृषभऋषि. तेव्हा त्यांनी आपले पशुप्रमाणे लिहून ठेवले, झाले ते गेले करून पण निस्तरणे आले स्त्रियांचे कपाळी. " [मालशे (१९७५) ५]

पतीव्रता धर्म पालनासाठी धर्मग्रंथात सीता, द्रौपदी, वालीवानराची बायको तारा, सत्यवती अशा स्त्रियांची उदाहरणे दिली आहेत. यावर ताराबाई या पुराणातील दाखल्यावर कठोरपणे टिका करतात. यावर ताराबाई लिहितात, "श्रीधर स्वामींनी लेखणीचे दोन टाक अधिक मारिले की, देवांनी केले त्याला काही हरकत नाही. मानवाने तसे करू नये पण स्वामीला तेव्हा एवढे कसे नाही कळले की हा कित्ता पुढे सारे वळणशुद्ध वळवितील. " [मालशे (१९७५) ३]

पारंपारिक ग्रंथानुसार ज्या स्त्रियांना पतिव्रता मानण्यात आले त्या व्यभिचारी, अनेक विवाह करणाऱ्या होत्या. तरीही त्यांना देवी मानण्यात आले. तर मग सर्वसामान्य स्त्रियांवर हा अन्याय का? असे ताराबाई शास्त्रकर्त्यांना प्रश्न विचारतात.

शास्त्रकर्त्यांनी स्त्री विरोधी शास्त्रेरचून देवादिकांच्या उदाहरणांनी पुरूष वर्तनाचे समर्थन केलेले पाहून शास्त्रकर्त्यांवर राग दर्शवितात. व आपल्या आचरणाने देवांनीही पुरूषांना साथ द्यावी याविषयी ताराबाई देवांची कान उघडणी करतात.

'स्त्री-पुरूष तुलना' हे पुस्तक प्रामुख्याने स्त्री-पुरूष भेदभाव, स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार यावर भाष्य करणारे पुस्तक असले तरी ताराबाईंना सामाजिक-

16389

राजकीय भानही अतिशय चांगले होते असे आढळते. भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजी राजवटीचे चांगले वाईट परिणाम त्या एकीकडे विशद करतात. तर दुसरीकडे ब्रिटीशांचे अनुकरण न करण्याचाही सल्ला त्या देतात.

## इंग्रजी राजवटीबाबत विचार

इंग्रज सरकारचे राज्य ईश्वराने कायम चिरकाल ठेवावे असे ताराबाई प्रार्थना करतात. कारण इंग्रजांनी देशात अनेक सुखसोयी केलेल्या होत्या. भौतिक सुधारणा घडवून आणल्या. विद्यादानाची सोय केली, नानाप्रकारचे कला-कौशल्य कायदेकानून, कचेऱ्या अशा अनेक सोयी केल्या. त्यांनी अबला नारीस सबला केल्याचे मत ताराबाई मांडतात.

इंग्रजांनी सतीबंदी कायदा करून सतीची अमानुष चाल बंद केली, विधवा पुनर्विवाह कायदा झाला तसेच स्त्री शिक्षणास इंग्रजी सत्तेने प्रोत्साहनही दिले. त्यामुळे स्त्रियांना तसेच सर्वसामान्य माणसाला जगणे सुरक्षित झाले. त्यामुळे ताराबाई इंग्रजी राजवटीस पाठिंबा देवून त्यांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट करतात. त्याबरोबरच त्या सरकारला दुवाही देतात.

इंग्रजी राजवटीच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांविरोधी मते, त्यावेळच्या वृत्तपत्रांत छापून येई. 'पुणे वैभव' सारख्या सनातनी वृत्तपत्रांत केशवपन कायदा केल्यास " बावणखणीसारख्या गृहशाला व विजयालक्ष्मी सारखे खटले चालविण्यासाठी सरकारने कोर्ट तयार करावी लागतील असे मत मांडले होते. त्यावर ताराबाई सडेतोड उत्तर देतात की, बावणखाणीसारख्या गृहशाला बांधण्याऐवजी सरकारास प्रत्येकीकरता गोजीरवाणे घरच बांधावे लागेल व तुमच्याकरिता म्हणजे पुरूषांकरिता बरेच टोलेजंग कारागृहे बांधावी लागतील. व ज्या स्त्रियांचा पुनर्विवाह होईल त्यांनी नवीन पतीबरोबर ब्रिटीश शासनास प्रोत्साहन देत रहावे. " [मालशे (१९७५) १४,१५] असे ताराबाई विधवा विवाह व केशवपन बंदी कायद्याचा पुरस्कार करतात.

इंग्रजी सत्तेचे ताराबाईंना महत्त्व असले तरी त्या दुष्परिणामांकडेही लक्ष देतात. देशातील पुरूषमंडळी इंग्रजांचे पोशाख, राहणीमान याबाबतीत इंग्रजी संस्कृतीचे अनुकरण करतात. त्यामुळे "आपले स्वदेशी रोजगार बुडून, हर प्रकारचे व्यापारी व कसबी कारागीर लोक उपाशी मरू लागले." [मालशे (१९७५) २] त्यामुळे देशातील संपत्ती दुसऱ्या देशात जाऊ लागली. देशरिवाज, धर्म न सोडता स्वदेशाभिमान बाळगावा असे ताराबाई स्वदेशीचा पुरस्कार करतात. इंग्रजी सत्तेने औद्योगिकी, उद्योगातून देशातील सर्व संपत्ती नेत आहेत असे ताराबाई ब्रिटीश सत्तेचा दुष्परिणाम दाखवून देतात. घरातील खर्चांचा हिशोब मांडणाऱ्या स्त्रियांचा काळ होता तेव्हा ताराबाईंनी देशहिताच्या दृष्टीने औद्योगिकीकरणाचा विचार मांडला. यावरून त्यांचा स्वदेशाभिमान, राष्ट्रीय जाणिव व्यक्त होते. [जोगळेकर (१९९१) ३४]

' ब्रिटीशसत्तेमुळे राज्य आणि प्रतिष्ठा यांची वाढती हानी झाल्यामुळे सरदार-दरकदारांच्या घरात स्त्रियांना पूर्वी असणारी सत्ता व प्रतिष्ठा संपुष्टात येऊन त्यांच्या जीवनसरणीवर अनेकाअनेक नव्या मर्यादा पडल्या. शिपाईगडी व तलवारबाजी करणारे मराठे पुरूष देखील हातातील तलवार गेल्यामुळे कलम बहाद्दर झाले.' [खोले (१९९१) ६५]

अशाप्रकारे इंग्रजांचे अनुकरण करून देशाचे नुकसानच होते. अनुकरणाने धर्म भ्रष्ट होत नाही पण इंग्रजांनी धार्मिकतेबाबत लक्ष घालू नये अशी समाजसुधार ओरड करतात. याविषयी ताराबाई खंत व्यक्त करतात. ब्रिटीश सत्तेमुळे घडलेल्या सुपरिणामांबरोबरच दुष्परिणामांची नोंदही ताराबाई घेतात.

## समारोप

स्त्रियांचे समाजातील स्थान कमी होण्यास ताराबाई पुरूषसत्ताक कुटुंबव्यवस्थेला जबाबदार धरतात. ताराबाईंनी प्रस्तावनेत "मी सर्वदा स्वजाती कल्याणार्थ झटून त्यांचे मनात सदाचरणाचे बीजारोपण करीन" असे म्हटले आहे. ह्या वाक्यातून त्या स्त्रियांच्या

कल्याणार्थ झटण्याचा विश्वास निर्माण करतात. तसेच ताराबाई आपल्या निबंधातून स्त्री जातीला अन्यायाविरूद्ध उभे राहण्यास प्रेरणा देतात. त्या म्हणतात, "............... झाशीच्या राणीसारख्या फार नकोत पण एक चार, पाचशे स्त्रियांना निसं:ग होवून हातात संगिनी होवू द्यात. मग पहा तुमची दुर्दशा कशी उडेल ती मग चुलीजवळ सुद्धा लपण्यास जागा मिळणे कठीण." [ मालशे (१९७५) ९]

ताराबाईंना येथे स्त्रियांना या खाईतून बाहेर काढण्यास कोणीही तयार नाहीत हे पाहून स्त्री दुर्दशेविषयी खंत वाटते. व त्या यासाठी स्वत:हून पुढे सरसावलेल्या दिसतात. व स्त्रियांना दास्यातून सोडविण्यासाठी स्त्रीवरील अन्यायाविरूद्ध आवाज उठविण्यास विचार करण्यास भाग पाडतात.

पुढे जाऊन त्या म्हणतात की, "माझे म्हणणे बरोबर आहे किंवा नाही हे तुम्ही जर खरे नि:पक्षपाती असाल तर पुर्ता विचार करून यात जे काही कमी जास्त असेल ते निवडा. पण येऱ्हवी आपलीच बाणी राखण्याकरिता जर पुढे घोडे ढकलाल तर मात्र नाइलाज आहे." [ मालशे (१९७५) २] यावरून ताराबाई समाजातील पुरूषमंडळीला स्त्रीजातीच्या कल्याणार्थ नि:पक्ष विचार करण्याची गरज असल्याचे पटवून देवून सत्यास सामोरे जाण्यास सांगतात. स्त्री कल्याणार्थ स्त्री-पुरूष दोन्हींनी झटणे आवश्यक असल्याचे ताराबाई येथे स्पष्ट करतात.

ताराबाई पोथ्या-पुराणे तसेच इतर साहित्यही वाचन करीत. त्यातील स्त्रिला पुरूषांपेक्षा कनिष्ठ स्थान, सर्व ठिकाणी पुरुषसत्ता मान्य करून पुरूषांच्या दुष्कृत्याला, वर्चस्वाला सत्य मानलेले पाहून ताराबाई स्त्रियांचे महत्त्व व पुरूषी वर्चस्वामागील पुरूषांचे राजकारण उघडे पाडतात.

ताराबाईंनी त्याकाळातील प्रसिद्ध स्त्रीचरित्र, मंजुघोषा, मुक्तामाला या कादंबरी तसेच मनोरमा या नाटकातील स्त्री चित्रण करण्याच्या पद्धतीवर टिका केलेली आहे. ताराबाई लिहितात, -"या राज्यात विद्येचे प्राबल्य व छापखाने झाल्यामुळे मंजुघोषा,

मुक्तामाला, (यथा) मनोरमानाटक असे बरेच लहान लहान ग्रंथ तयार झाले आहेत. प्रत्येक गोष्टीत, पुस्तकात शृंगार, विनोद, शोक हे तीन गुण असल्यावाचून रस भरत नाही. हे खरे, पण ग्रंथ कर्त्यांनी आपण जे काही लिहितो हे घडण्यासारखे किंवा पूर्वी कधीकाळी असे घडून आले होते किंवा नाही याचा आधी विचार करून मग पुढे ग्रंथ रचावा. " [मालशे (१९७५) २९]

या साहित्यातून स्त्रीचे अस्वाभाविक चित्रण न पटण्यासारखे आहे. ' या पुरुषांनी स्वत:च्या रंजनासाठी रचलेल्या केवळ कपोलकल्पित कहाण्या आहेत, असे ताराबाई आपले मत नोंदवितात.' [भालेराव (२००८) ४९] या कादंबरी व नाटकात आलेली स्त्री चित्रणे ताराबाईंना खोटी वाटतात. ताराबाईंनी केलेली ग्रंथचिकित्सा स्त्रियांच्या दु:खाचा व पुरूषवर्चस्वाचा प्रत्यय आणून देते. लक्षात घेण्यासारखे आहे ते म्हणजे प्रमाणित पुरूषसत्तेबरोबर कोणालाही न जुमानता ताराबाई लढा देतात. 'लग्नाशिवायचे समाजातील महिलांचे स्थान याविषयी मात्र त्या वर्णन करीत नाहीत. आणि आर्थिक स्वाधीनतेवरही स्पष्टपणे मत मांडत नाहीत. ' [चक्रवर्ती (१९९८) २५२]

ताराबाई मुलगामी स्त्री प्रश्न मांडताना 'स्त्री–पुरूष तुलना' पुस्तकात जहाल भाषा वापरतात. बंदुकीच्या नळीत शक्ती ठासून भरून नेमबाज माणसाने ती उपयोगात आणावी. त्याप्रमाणे ताराबाईंची भाषा आहे. यापेक्षाही कडक भाषा असती तर वापरलीच असती असे ताराबाई स्पष्ट करतात.

ज्या पुस्तकात स्त्री समस्येविषयी मुलगामी प्रश्न मांडले त्या पुस्तकास प्रतिसाद कमी मिळाल्याचे दिसून येते. 'त्या काळात ताराबाई शिंदेंचा निबंध सर्वसामान्य स्त्रिच्या वाचनात येण्याची शक्यता कमीच होती कारण स्त्री शिक्षणाला १९ व्या शतकात प्रारंभ झाला असला तरी अल्पसंख्य सुशिक्षित स्त्रीवर्गाच्या पलिकडचा प्रचंड मोठा स्त्री वर्ग अशिक्षितच होता. कौटुंबिक व आर्थिक पारतंत्र्य, लैंगिक शोषण यातच हा स्त्रीवर्ग खितपत पडला होता. आणि त्यामुळे स्त्रीची कनिष्ठता व तिचे शोषण यामागील कारणे या

स्त्रियांच्या लक्षात येणे अशक्य होते. ' [ पाटील (२००२) १२३] त्यामुळे त्यांचे अशा पुस्तकाकडे लक्ष जाणे कठीणच होते.

'ताराबाई या ब्राह्मणेत्तर जातीतल्या होत्या. त्या काळात लेखन, प्रकाशन हे प्रामुख्याने वरिष्ठ वर्गाच्या हाती असल्याने त्या दुर्लक्षित राहिल्या असाव्यात.' [ जोगळेकर (१९९१) ४०] जोतीरावांनी 'सत्सार' पुस्तकात 'स्त्री–पुरूष तुलना' पुस्तकाची दखल घेतली असली तरी सत्यशोधक समाजाशी संबंधित व्यक्ती व इतर समाज सुधारकांनी त्याची दखल घेतली नसल्याचे दिसून येते. ताराबाईंनी पुरूषप्रधान मूल्यावस्थेत वाढलेल्या पुरूषांना आणि त्यांच्या वर्चस्वाला दिलेले आव्हान व देवांपासून धर्ममार्तंडापर्यंत सर्वांच्या कारस्थानांची केलेली चिरफाड यामुळे या पुस्तकाचे महत्त्व अधिक आहे.

ताराबाई शिंदेंनी मांडलेला स्त्रीवाद पाहता असे वाटते की, ज्यांनी भारतात स्त्रीवादाच्या मांडणीला सुरूवात केली त्यात प्रथम त्यांचे नाव घ्यावे लागेल. [ पाटील (२००२)८७] ताराबाईंचा हा निबंध म्हणजे एका स्त्री जातीच्या वतीने संपूर्ण पुरूषजातीशी केलेला एक दीर्घ संवाद आहे. त्या संपूर्ण पुरूषजातीला समोर बसवून स्त्री जातीची कैफियत मांडतात.

ताराबाई स्त्रीवरील दोष खोडून काढण्यासाठी सडेतोड युक्तिवाद करतात 'हे युक्तिवाद पाहताना ताराबाईंनी किती सखोलपणे स्त्री प्रश्नांचा अभ्यास केला हे आपल्या लक्षात येईल. ताराबाईंच्या आधी इतक्या खोलवर कोणीही स्त्री गेलेली नाही, हे आपल्या लक्षात येईल.' [ भालेराव (२००८) १३] ताराबाई ह्या ग्रंथात प्रखर वैचारिक विषयाची मांडणी करतात.

# संदर्भसूची


१. आम्व्हेट गेल, (१९९८), 'जोतिबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार', लोकवाड्.मय गृह, द्वितीय आवृत्ती.

२. ओहॅनलीन रोझालीन, (१९९४), 'अ कंपॅरिझन बीटवीन वुमेन अॅण्ड मेन', ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

३. खोले विलास, (१९९९), 'स्त्री-पुरूष तुलना', प्रतिमा प्रकाशन, पुणे.

४. Chakaravarti Uma, (1998), 'Rewriting History the life & times of Pandita Ramabai' Zubaan, New Delhi.

५. जोगळेकर मृणालिनी, (१९९१), 'स्त्री अस्मितेचा अविष्कार १९ वे शतक, भाग-३', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

६. पाटील शोभा , (२००२), 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्त्रिवादी शोध', मल्हार प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती.

७. भालेराव इंद्रजित, (२००८), 'महाराष्ट्राचे शिल्पकार ताराबाई शिंदे', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती.

८. मालशे सं.ग., (१९७५), 'स्त्री -पुरूष तुलना', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई.

९. रानडे प्रतिभा, (२००५), 'स्त्रीप्रश्नांची चर्चा १९ वे शतक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे.




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.